# मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (मु.) यांचे कार्यालय,
ई-मेल : dmchq@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/उपायुक्त(मु.)/१०३१/२०२५-२६
दि. २५/०३/२०२६

**परिपत्रक**

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत आयोजित कार्यक्रमांच्या प्रभावी नियोजनाबाबत.**

**संदर्भ : मा. महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील जा.क्र.मनपा/महापौर/७३/२०२५-२६, दि. २४/०३/२०२६ रोजीचे पत्र. (ई-८६७३०४९)**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत वेळोवेळी सांस्कृतिक, सामाजिक तसेच इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असतात. सदर कार्यक्रमाचे योग्य नियोजन व समन्वय अभावामुळे कार्यक्रमाचा अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. अशा परिस्थितीत महानगरपालिका निधीचा योग्य व परिणामकारक वापर होण्यासाठी कार्यक्रमाचे नियोजन अधिक सुयोग्य पध्दतीने होणे आवश्यक आहे.

तरी सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, यापुढे महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन व रुपरेषा निश्चित करण्यापुर्वी मा. महापौर यांचेशी सविस्तर चर्चा करुन दिलेल्या मागदर्शनानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरुन कार्यक्रम अधिक प्रभावी यशस्वीरित्या पार पाडता येईल, याची नोंद घेण्यात यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

१. **उप-आयुक्त (सर्व)**
२. **सर्व विभागप्रमख / खातेप्रमुख**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :-**

१. **मा. महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका**
२. **मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका**
३. **मा. अतिरिक्त आयुक्त (१ व २), मिरा भाईंदर महानगरपालिका**

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# डिंपल विनोद मेहता

## महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
आयुक्त कार्यालय
खाते सा.प्र.वि
आ.क्र. ९२६ दिनांक २५/३/२०२६
स्वीय सहाय्यक उपायुक्त (मु.)
E/8681335 आयुक्त

E-8673049
24/3/26

जा.क्र/मनपा/महापौर/ ७३ /२०२५-२६ दि.२४/०३/२०२६

प्रति,
**मा.आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत आयोजित कार्यक्रमांच्या प्रभावी नियोजनाबाबत.**

महोदय,

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत वेळोवेळी सांस्कृतिक,सामाजिक तसेच इतर प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात. अलीकडेच "वसुंधरा महोत्सव" तसेच महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांच्या अनुषंगाने असे निदर्शनास आले की, सदर कार्यक्रमांचे योग्य नियोजन व समन्वय अभावामुळे पदाधिकारी, नगरसेवक तसेच नागरिकांची उपस्थिती अपेक्षेप्रमाणे नव्हती. परिणामी कार्यक्रमाचा अपेक्षित परिणाम साध्य झाला नाही, असे नमूद करणे उचित ठरेल.

अशा परिस्थितीत, महानगरपालिकेच्या निधीचा योग्य व परिणामकारक वापर होण्यासाठी कार्यक्रमांचे नियोजन अधिक सुयोग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे.

तरी यापुढे महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे नियोजन,आयोजन व रुपरेखा निश्चित करण्यापूर्वी माझ्याशी सविस्तर चर्चा करण्यात यावी व आवश्यक ते मार्गदर्शन घेण्यात यावे, जेणेकरून कार्यक्रम अधिक प्रभावी व यशस्वीरीत्या पार पाडता येतील.

DMC [HQ]

Dmehta
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

25/3/26
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे -४०१ १०१.
दूरध्वनी : 022-28190344 Email : mbmcmayor199@gmail.com